**नियमीत दिवाणी दावा क्र. ७३/२०१४**
**संजय – विरुध्द – आदेश**

**<u>निशाणी क्र. ८७ वर आदेश</u>**
**(पारित दिनांक ०४.०२.२०२६ )**

अर्जाचे व अभिलेखाचे अवलोकन केले व युक्तीवाद ऐकला.

२. प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी, दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरूस्तीसाठी दाखल केला आहे. वादी यांचे थोडक्यात कथन की, दावा हा जाहीर घोषित होऊन मिळण्याकरिता, वाटणीकरिता, ताब्यास व निरंतरच्या मनाई हुकूमास दाखल केला आहे. दि.१३/१२/२०१८ रोजी दावा खारिज करण्यात आला होता. त्यानंतर त्याविरुध्द अपिल दाखल करण्यात आले. अपिल हे माघारी पाठविण्यात आले. मुद्दा क्र.२ व ७ या मर्यादीत मुद्यांवर म्हणजे घरमिळकतमध्ये वादी यांचा काही हिस्सा आहे काय याबाबत पाठविण्यात आले. वादी व त्यांचे वारस हे वेगवेगळ्या ठिकाणी राहतात. त्यांना घराबाबत कोणतीही इच्छा नाही, हे त्यांनी उलटतपासात कबूल केले. त्यामुळे त्यांना परिच्छेद ३ नंतर ३अ नमुद करायचा आहे. त्यामुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होणार नाही. सबब, दुरुस्तीची परवानगी देण्यात यावी, अशी त्यांनी विनंती केली.

३. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी आक्षेप घेतला. दुरुस्ती ही न्यायनिर्णयासाठी आवश्यक नाही. त्यामुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होईल. सबब अर्ज खारिज करावा अशी त्यांनी विनंती केली. इतर प्रतिवादी यांनी हरकत घेतली नाही.

४.  युक्तीवाद ऐकून घेऊन दाव्याचे अवलोकन केले. दावा हा वाटणीकरीता, ताब्याकरिता व निरंतरच्या मनाई हुकूमाकरिता तसेच जाहीर घोषित होउन मिळण्याकरिता दाखल केला आहे. दावा यामध्ये दि.२०/०२/२०२६ रोजी नि.क्र.२० अन्वये मुद्दे निश्चित करण्यात आले. त्यानंतर पुरावा घेण्यात आला. माझे पुर्वाधिकारी यांनी दि.१३/१२/२०१८ रोजी दावा खारिज केला असे दिसुन येते. त्यानंतर त्याविरुध्द मा. जिल्हा न्यायालयात दाद मागितली होती. नियमित दिवाणी अपिल नंबर १८५/२०२३ हे दाखल करण्यात आले. त्यामध्ये मा. जिल्हा न्यायाधिश यांनी दावा माघारी पाठविला. मा. जिल्हा न्यायाधिश यांनी मुद्दा क्र.२ व ७ यावर दोघो पक्षांना संधी देऊन दुरुस्त मजकुरांवर संधी द्यावी असे निर्देश दिले.

५.  त्यानंतर दावा हा या न्यायालयात प्राप्त झाला. त्याबाबतचा आदेश दि.०३/११/२०२६ रोजी न्यायालयाने पारित केला. त्यानंतर प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दाखल केला.

६.  मार्च,२०२० पासून कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव टाळण्यासाठी टाळेबंदी लागू केली होती. त्याचा परिणाम जन–जीवनासोबतच न्यायालयीन कामकाजावर देखील झाला. मा. उच्च न्यायालयाने न्यायालयीन कामकाजासाठी वेळोवेळी परिपत्रक निर्गमित केले. मा. उच्च न्यायालयाच्या परिपत्रकान्वये दिनांक ०२.०८.२०२१ पासून न्यायालयीन कामकाज हे पूर्ववत सुरू झाले.

७.  वादी यांना दाव्यात दुरुस्ती करावयाची आहे. त्यांना परिच्छेद ३अ नमुद करावयाचा आहे. वादी यांना दुरुस्ती मा. जिल्हा न्यायालय यांनी दिलेल्या निर्देशानुसारच करावयाचे दिसुन येते. दाव्यामध्ये दुरुस्ती केल्यास मुळ स्वरुपात बदल होणार नाही. या उलट दुरुस्ती ही आवश्यक आहे. अशा अभिलेखावरील परिस्थीतीवरुन अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे असे माझे मत नोंदवित आहे.

सबब,  खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>**आदेश**</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादी यांना दाव्यात,  अर्जात नमुद दुरूस्ती करण्याची परवानगी देण्यात येते आणि सदरची दुरूस्ती त्यांनी १४ दिवसांच्या आत करावी.

३. वादी यांनी पुढील तारखेच्या आत, (१४ दिवसांच्या आत) दुरूस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

RAJU BHASKAR DOLE
Judgment Digitally signed by RAJU BHASKAR DOLE Date: 2026.02.06 11:23:21 +0530

(रा.भा.डोळे)

दिनांक : ०४.०२.२०२६.    सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उमरेड.